विषय :- फौजदारी प्रक्रिया संहिता सन-१९७३ चे कलम १४४ प्रमाणे प्रतिबंधकआदेश.

**आदेश,**

१. पुणे शहर व परिसरात विविध ठिकाणी वेगवेगळ्या संवेदनशील अतिमहत्वाच्या आस्थापना कार्यरत आहेत.अशा आस्थापनावरती असामाजिक तत्व व दहशतवादी यांचेकडुन ड्रोन,रिमोट कंट्रोल लाईट एअर क्राफ्ट,एअर मिसाईल,पॅराग्लायडर्स यांचा वापर करुन हल्ल्याची शक्यता नाकारता येत नाही.त्यामुळे सार्वजनिक शांतता धोक्यात येवुन मालमत्तेचे नुकसान होवुन पुणे शहरात कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होवु शकतो.

२. अशा दहशतवादी व असामाजिक तत्वाकडुन अशा प्रकारचे हल्ले पुणे शहर पोलीस आयुक्तालयामध्ये होण्याची शक्यता असल्याने अशा प्रकारच्या हल्ल्यास प्रतिबंध होणेआवश्यक आहे.

३. आणि म्हणुन मी रविंद्र कदम पोलीस सह.आयुक्त,पुणे शहर,तथा विशेष कार्यकारी दंडाधिकारी,मला सी.आर.पी.सी.१९७३ (अॅक्ट II of 1974) अधिनियामाव्दारे दिलेल्या अधिकाराचा वापर करुन आदेशित करतो की, Drone Camera, Remote, Controlled micro Light, air craft ,aerial missiles, Para glidersetc यांना पुणे शहर पोलीस आयुक्तलयाच्या कार्यक्षेत्रात ६० दिवसापर्यंत म्हणजेच दिनांक १७/०८/२०१७ ते दिनांक १६/१०/२०१७ पर्यंत उड्डाणास प्रतिबंधक करत आहे.पोलीसांच्या कामकाजाकरीता आवश्यक असणारे ऐरियल सर्व्हे व विशिष्ठ कामाकरीता पोलीस उप-आयुक्त,विशेष शाखा-१,पुणे शहर यांनी दिलेल्या खास परवानग्या यांना यातुन सुट देण्यात येत आहे.

४. सदरचे आदेश हे दिनांक १७/०८/२०१७ रोजी ००.०१ ते दिनांक १६/१०/२०१७ रोजी पर्यंत २४.०० वा.पर्यंत अंमलात राहतील.

५. या आदेशाचे उल्लंघन करण्या-या व्यक्ती/संस्था यांचे विरुध्द भारतीय दंड विधान १८६० चे कलम १८८ प्रमाणे कार्यवाहीस प्रात्र ठरतील.

६. या आदेशाची बजावणी प्रत्येकास करता येणे शक्य नसल्याने सदरचे आदेश एकतर्फी पारित करण्यात येत आहेत.सदरचे आदेश वर्तमान पत्रातुन प्रसिध्द करुन त्यांची प्रत सर्व पोलीस स्टेशन, सर्व सहा.पोलीस आयुक्त कार्यालय,सर्व पोलीस उप-आयुक्त कार्यालय,महानगर पालीकेची विभागीय कार्यालये,वॉर्ड ऑफीस व तहसिलदार कार्यालय येथे चिटकवण्यात यावीत.

सदरचा आदेश मी, माझ्या सहीनिशी आज दिनांक १६/०८/२०१७ रोजी दिला आहे.